**भविष्य निर्वाह निधीमधील वर्गणीची रक्कम नियम वयोमानानुसार सेवानिवृत्ती लगतच्या शेवटच्या ३ महिन्यात वसूल न करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. भनिनि-२००६/५२३/प्र.क्र.९०/०६/१३-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ डिसेंबर, २००७.

वाचा :- १) शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्र.- भनिनि २००५/प्र.क्र.२/१३-अ, दि.१/२/२००५.

## -: परिपत्रक :-

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या प्रकरणी त्यांच्या सेवानिवृत्ती लगतपूर्वीच्या शेवटच्या ३ महिन्यात भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसूल न करण्याबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ च्या नियम ७(४) चे काटकोरपणे पालन करण्याबाबत वर नमूद दि. १/२/२००५ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. भविष्य निर्वाह निधी नियमात असलेली तरतूद वर नमूद परिपत्रकान्वये सर्व शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणूनही महालेखापाल कार्यालयाने शासनाच्या निदर्शनास आणले आहे की, काही आहरण व संवितरण अधिकारी भविष्य निर्वाह निधी वर्गणीदाराच्या सेवानिवृत्ती लगतच्या शेवटच्या ३ महिन्यामध्ये वसूली करतात. त्यामुळे संबंधिताच्या भविष्य निर्वाह निधी रकमांचे लेखे विहित वेळेत प्रमाणित करणे महालेखापाल कार्यालयास शक्य होत नाही. परिणामी संबंधित वर्गणीदारास त्याच्या भविष्य निर्वाह निधीतील रक्कम मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे संबंधितास व्याज परिगणित करणे महालेखापाल कार्यालयास भाग पडते व त्यामुळे शासनावर नाहक आर्थिक भुर्दंड पडतो.

३. वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पुन्हा सूचना देण्यात येत आहेत की, भविष्य निर्वाह निधी **नियम** क्र. ७(४) चे पालन ज्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून केले जाणार नाही अशा अधिका-यांवर वर नमूद दि. १/२/२००५ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ येथे नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण जबाबदारी निश्चित करून अतिरिक्त प्रदान कराव्या लागणा-या व्याजाची वसूली त्यांचेकडून तातडीने करण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील कार्यालयांनी जे आहरण व संवितरण अधिकारी वरीलप्रमाणे अनियमितता करीत असल्याचे आढळून येईल त्यांच्यावर दिनांक १/२/२००५ च्या परिपत्रकानुसार कारवाई करण्यात येईल हे पाहण्याची दक्षता घ्यावी व त्यांसदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १ महिन्यात महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात यावा.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २००७१२१८१७०७१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( बा. वि. निकम )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

(कृ.मा.प.)

F:\old data\Mehendal\ paripatrak-2007

उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल-१( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (१० जादा प्रतीसह),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (१० जादा प्रतीसह),
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
वरीष्ठ उप महालेखापाल,भविष्य निर्वाह निधी शाखा, जुनी सी.जी.ओ. बिल्डींग, न्यु मरीन लाईन्स, १०१, महर्षि कर्वे रोड,मुंबई-४०००२० (५० जादा प्रतीसह)
मुख्य लेखा परीक्षक, निवासी लेखे, कोकण भवन, नवी मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग (कोषा-प्र-५), मंत्रालय,मुंबई,
मंत्रालयाचे इतर सर्व प्रशासनिक विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती),
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, मंत्रालय, मुंबई (२ प्रती),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
*पत्राने.